दि.२३.०२.२०२५ ते ०४.०३.२०२५ (प्रवासाचा कालावधी समाविष्ट करुन) या कालावधीत आयोजित ब्राझील देशाच्या अभ्यास दौऱ्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांकः काजूमं-०९२५/प्र.क्र.४५/२१-स

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २८ मार्च, २०२५.

संदर्भ:-

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय, क्र.काजूमं-०९२५/प्र.क्र.४५/२१-स, दि.२१.०२.२०२५.

प्रस्तावना:-

काजू मंडळाअंतर्गत काजू फळापासून वेगवेगळे पदार्थ निर्मिती उदयोगांचा अभ्यास करण्यासाठी मा. आमदार श्री. दिपक केसरकर यांच्यासमवेत (१) श्री. अनिल पाटील, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, (२) श्री.एम. देवेंदर सिंग, जिल्हाधिकारी, रत्नागिरी, (३) डॉ. मंदार हरिश्चंद्र खानविलकर, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी व (४) डॉ. प्रफुल्ल चंद्रकांत माळी, असोसिएट डीन, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी या चार अधिकाऱ्यांचा दि. २३ फेब्रुवारी, २०२५ ते ४ मार्च, २०२५ या कालावधीचा ब्राझील देशाचा दौरा आयोजित करण्यात आला होता.

सदर ४ अधिकाऱ्यांपैकी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे व्यतिरिक्त (१) श्री.एम. देवेंदर सिंग, जिल्हाधिकारी, रत्नागिरी, (२) डॉ. मंदार हरिश्चंद्र खानविलकर, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी (३) डॉ. प्रफुल्ल चंद्रकांत माळी, असोसिएट डीन, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी या ३ अधिकाऱ्यांच्या ब्राझील देशाच्या अभ्यास दौऱ्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

तथापि, तद्नंतर श्री. अनिल पाटील, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग हे देखील शासन मान्यतेच्या अधीन ब्राझील अभ्यास दौऱ्यास गेले होते. त्यामुळे संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता दिलेले ३ अधिकारी व श्री. अनिल पाटील, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या काजू बोर्ड अंतर्गत काजू फळापासून वेगवेगळे पदार्थ निर्मिती उदयोगांचा अभ्यास करण्यासाठी दि. २३ फेब्रुवारी, २०२५ ते ४ मार्च, २०२५ (प्रवासाचा कालावधी समाविष्ट करुन) या कालावधीतील ब्राझिल देशाच्या अभ्यास दौऱ्यास कार्योत्तर मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

काजू बोर्ड अंतर्गत काजू फळापासून वेगवेगळे पदार्थ निर्मिती उदयोगांचा अभ्यास करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांनी दि.२३ फेब्रुवारी, २०२५ ते ४ मार्च, २०२५ (प्रवासाचा कालावधी समाविष्ट करुन) या कालावधीत केलेल्या ब्राझिल अभ्यास दौऱ्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव	पदनाम
१	श्री. अनिल पाटील	जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग
२	श्री.एम. देवेंदर सिंग	जिल्हाधिकारी, रत्नागिरी
३	डॉ.मंदार हरिश्चंद्र खानविलकर	सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी
४	डॉ. प्रफुल्ल चंद्रकांत माळी	असोसिएट डीन डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी

२. सदर अभ्यास दौऱ्याचा खर्च महाराष्ट्र राज्य काजू मंडळामार्फत करण्यात येईल.

३. सदर अभ्यास दौऱ्यास उपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यांचा अभ्यास दौऱ्याचा कालावधी हा कर्तव्य कालावधी समजण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०३२८१०२०२१३३०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAVI SANDEEP SHINDE

Digitally signed by MADHAVI SANDEEP SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=020531e249e88fe74bf6db805f42944e7f29bc0ba6134c83c1f183b8cc27f2ff, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=4CB1CBBD6A4EE442FDAA6C1B358BF61FEAF9AEFC16E8F39E9EE1D06B9E8A7A59, cn=MADHAVI SANDEEP SHINDE
Date: 2025.03.28 10:21:04 +05'30'

(माधवी सं.शिंदे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (सहकार व पणन), मंत्रालय, मुंबई
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य काजू मंडळ, तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
३. श्री.अनिल पाटील, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.
४. श्री.एम. देवेंदर सिंग, जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
५. डॉ.मंदार हरिश्चंद्र खानविलकर, सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या, डॉ.बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी.
६. डॉ.प्रफुल्ल चंद्रकांत माळी, असोसिएट डीन डॉ.बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, रत्नागिरी.
७. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य -१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) मुंबई.
८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवडनस्ती (२१-स).